| | |
|---|---|
| MHAU070008142025 | **नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२५**<br>**शेकनाथ वि. हिरालाल** |

## <u>निशाणी क्र. २० खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी मोजणीच्या अर्जावर झालेला लेखी जबाब नाही असा आदेश रद्द करून तो जबाब दाखल करून घेण्याची विनंती केली आहे. उलटपक्षी वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पानकडे यांनी प्रस्तुत अर्जावर योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली.

३. अर्ज व त्यातील कथने वाचून पाहिली. वादीने प्रस्तुतचा दावा हा ताब्याकरीता व कायमस्वरूपी मनाईकरीता दाखल केला आहे. त्यामुळे एकंदरीत दाव्याचे स्वरूप पाहता व त्यातील कथनांचा विचार करता प्रतिवादी यांना योग्य बचाव घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. उलटपक्षी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये १००/-(अक्षरी शंभर रुपये मात्र) च्या द्रव्यदंडावर मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

३. द्रव्यदंडाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादीचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ANIKET ARUN KALAMKAR
Date: 2026.02.27 17:38:22 +0530

दिनांक - २७/०२/२०२६

( ए. ए. कळमकर )
३ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, गंगापूर.